पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : ४१ • जून २०१४ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## कामगार दिंडी आळंदी-पुणे चा भव्य सोहळा

कामगार कल्याण विभागामार्फत आळंदी ते पुणे कामगार दिंडीचे दि.२१/६/१४ रोजी आयोजन करण्यात आले होते. दिंडीत जवळपास ३०० अधिकारी/सेवक सहभागी झाले होते. पुणे मनपा भवनापासून सकाळी ५.३० वाजता दिंडीचे प्रस्थान झाले. साईबाबा मंदीराजवळ सदर दिंडी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी झाली.

या ठिकाणी श्री.नरसिंगे, श्री. पठारे व त्यांच्या सहकाऱ्यांनी अल्पोपहार व चहापान व्यवस्था केली होती. तदनंतर दिंडीमार्गामध्ये माजी कोठी अधिकारी श्रीमती भारती मॅडम, यांनीही चहा व अल्पोपहाराची व्यवस्था केली होती. माजीदिंडीमध्ये काही समाजप्रबोधनपर फलक तयार करण्यात आले होते. सारे करुया एक निर्धार-वृक्षलागवडीचा विचार छान, प्रदूषण टाळण्याचा मार्ग महान, पीएमपीएमएल ने करु प्रवास, आळा बसेल प्रदुषणास, पाणी हे जीवन आहे हे व्यर्थ घालवू नका, असेल आनंदी नारी, सुख फुलेल घरोघरी, इत्यादी प्रबोधन फलक हातात घेवून सहभागी वारकऱ्यांमध्ये पाणी व पर्यावरण संरक्षण व संवर्धन, शहराचे आणि वैयक्तिक आरोग्य, मनपातील विविध कर संकलन, सार्वजनिक स्वच्छता, नागरी सुविधा, कचरा वर्गिकरण, सक्षम साक्षर नारी याबद्दल जागृती निर्माण करुन प्रबोधनाचा यशस्वी उपक्रम राबविला. मा.श्री.शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार), मा.श्री.विलास कानडे, सह महापालिका आयुक्त, स्थानिक संस्था कर, मा.श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली कामगार दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. पुणे मनपा कामगार युनियनचे पदाधिकारी व सदस्य दिंडीस उत्स्फूर्तपणे सहभागी होते. मा. कानडे साहेब व मा. दौंडकर साहेब यांनी कर्मचारी भजनी मंडळाबरोबर उत्स्फूर्तपणे भजनात सहभाग घेतला. भजन म्हणण्यामध्ये कर्मचारी श्री. विठ्ठल जगदाळे, श्री. नागनाथ गायकवाड, श्री.आप्पा गवारे, इत्यादी अनेक कर्मचारी अग्रेसर होते. या अभिनव उपक्रमाची बहुसंख्य सहभागी वारकऱ्यांनी व वारकऱ्यांचे स्वागत करणाऱ्या मान्यवरांनी दखल घेवून उत्तम प्रतिसाद दिल्याचे अनुभवास आले. या कामगार दिंडीचे सर्वत्र उत्स्फूर्तपणे स्वागत करुन दिंडी प्रमुखांचा श्रीफळ व स्मृतीचिन्ह देवून सत्कारही करण्यात आला. तसेच, अनेक नागरिक, स्वयंसेवी संस्था, प्रसार माध्यमें यांनी विशेष नोंद घेवून या आगळ्या वेगळ्या उपक्रमास मन:पूर्वक दाद दिली. कळस येथे सौ.चंचला कोद्रे, महापौर, पुणे, मा. विकास देशमुख, महापालिका आयुक्त, मा. सतिश म्हस्के, सभासद, मा. सुमन पठारे, सभासद, मा. संध्या गागरे, महापालिका सहाय्यक आयुक्त यांनी कामगार दिंडीचे स्वागत करुन या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले. तसेच, मा. चंचला कोद्रे व मा. संध्या गागरे यांनी महिला कर्मचाऱ्यांबरोबर फुगडी खेळली व तुळशी वृंदावन डोक्यावर घेवून क्षणिक वारकरी सुखाची अनुभूती घेतली. या कामगार दिंडीमध्ये सहभागी झालेल्या अधिकारी/सेवकांसाठी राम सोसायटीत श्री.रमेश काथवटे, श्री.शिवाजी घारे, श्री. रमेश गायकवाड, श्री.सिद्राम सिंदगी, श्री. रासकर व श्री.अशोक ढगे यांनी घरगुती भोजनाची उत्तम व्यवस्था त्यांच्या मित्र व सर्व कुटुंबियांच्या सहकार्याने केली होती. त्यांच्या या सहकार्याबद्दल सर्वांनी त्यांना व कुटुंबियांना धन्यवाद दिले व श्रीफळ देवून सत्कार केला. त्यानंतर दिंडीचे पुढील मार्गक्रमण सुरु झाले.

सायंकाळी ६.३० वाजता दिंडी सोहळा मनपा भवन येथे पोचला. या ठिकाणी हिरवळीवर पुणे म्युनिसिपल अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष श्री. दिलीप बागल यांनी सर्वांसाठी चहापानाची व्यवस्था केली होती. त्यानंतर भजनाचा कार्यक्रम झाला, हरिपाठ झाला व शेवटी पसायदानाने दिंडीचा समारोप झाला. दैनंदिन कामाबरोबर सामाजिक बांधिलकीच्या नात्याने करण्यात येणारे हे कार्य उत्तरोत्तर असेच वृध्दिंगत होत जावो व त्यामध्ये सर्वांचा स्नेह आहेच तो उत्तरोत्तर वृध्दिंगत व्हावा, हीच माउलींच्या चरणी प्रार्थना.












## पुणे महानगरपालिकेत पर्यावरण दिन साजरा

दि.५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त शहरामध्ये अनेक शाळा, महाविद्यालये व कार्यालयांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या निमित्ताने पर्यावरण जनजागृती व संवर्धनाच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी पर्यावरणप्रेमींना मिळते.

इंद्रधनुष्य पर्यावरण व नागरिकत्व केंद्र, पुणे मनपातर्फे दिनांक ५ जून, २०१४ रोजी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सकाळी ६ ते १० या वेळेत वारजे येथील टेकडीवर वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. कमिन्स प्रा.लि., वन विभाग, इंद्रधनुष्य पर्यावरण व नागरिकत्व केंद्र, पुणे मनपा व बायोडायवर्सीटी मॅनेजमेंट कमिटी यांच्या एकत्रित प्रयत्नाने हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

सकाळी ११ ते २ या वेळेत वन्यजीव छायाचित्र प्रर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. विविध गटांमध्ये छायाचित्रांचे विभाजन करुन त्यांची थीम बेस मांडणी करण्यात आली होती. पक्षी, सस्तन प्राणी, सरपटणारे प्राणी, उभयचर प्राणी, किटक, कवक इत्यादी गटांमध्ये छायाचित्रांना लोकांसमोर मांडण्यात आले होते. या प्रदर्शनाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

दुपारी २ ते ५ या वेळेत विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा व भेट कार्ड बनविण्याची स्पर्धा आयोजित केली होती. प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणाशी निगडित प्रश्नावली तयार करण्यात आली होती. भेटकार्ड बनविण्यास देखील विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

अशा प्रकारे जागतिक पर्यावरण दिन इंद्रधनुष्य नागरिकत्व केंद्र, पुणे मनपामार्फत साजरा करण्यात आला.

## स्त्रीचे स्थान काय?

ज्या क्षणी भारतीय स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला तो क्षण समानतेचं आणि स्वातंत्र्याचं प्रतीक बनलं. पण वास्तव जगात मात्र स्त्रियांना समाजात विशेष स्थान नाही असच दिसतं. म्हणूनच हुंडाबळी, नववधूंना जाळणे, स्त्री गर्भाची हत्या व इतर अशा स्वरुपाचे गुन्हे समाजात घडताना दिसतात. यत्र नार्यस्तु पूजन्ते, रमन्ते तत्र देवता. असं आपल्या जुन्या धर्मग्रंथात सांगण्यात येतं.पण खऱ्याखुऱ्या आयुष्यात तसं नसतं.

ज्या देशांमध्ये स्त्रियांना आर्थिक, सामाजिक, राजकीय बाबतीत सर्वार्थाने स्वातंत्र्य आहे त्यांची यादी काढल्यास भारताचं नाव शेवटून दुसरं तिसरं असेल.

या यादीत पहिल्या तीन क्रमांकाचे देश आहेत स्वीडन, नॉर्वे आणि डेन्मार्क हे स्कँडिनेव्हियन देश. युरोपच्या एका कोपऱ्यात असणारे हे छोटेसे देश. पण त्यांच्या देशातील स्त्रियांना मात्र सर्वात आदराने वागविण्यात येते.

स्वीडनच्या राजघराण्यातील नियमानुसार त्या घराण्यात जन्माला आलेल्या पहिल्या अपत्याकडे राज्याधिकार येतो. मग ते अपत्य मुलगा असो की मुलगी. हे आजही घडतं. लवकरच हीच पध्दत नॉर्वेतसुध्दा प्रचलित होणार आहे. या देशांमध्ये स्त्रियांना पुरुषांपेक्षा वेगळी वागणूक देता येत नाही. तो गुन्हा ठरतो.

आपल्या देशात स्त्रियां टॅक्सी किंवा रिक्षाने रात्री प्रवास करण्याचं धाडसच करणार नाहीत. आणि यदाकदाचित केलच तर टॅक्सी ड्रायव्हर जेवढे भाडे होईल त्याच्या कितीतरी पट जास्त भाडे वसुल केल्यावाचून राहणार नाही. याउलट स्टॉकहोमसारख्या देशामध्ये स्त्रियांनी रात्री प्रवास केल्यास अर्धेच भाडे घेतले जाते.

आपण व्यासपीठांवरुन भाषणे देतो, देवीची आराधना करतो. आपल्या राज्यघटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार दिलेले आहेत, असं आपण मोठ्या अभिमानाने सांगतो. शंकराचं जे अर्धनारीनटेश्वर हे रुप आहे त्यातूनही हेच प्रतीत होतं, की शंकरानं स्त्री-पुरुष समानतेचा स्विकार केलेला आहे. आपले जुने धर्मग्रंथ आणि आपल्या इतिहासात स्त्रियांचे गुणवर्णन केलेले असते. पण खरोखर आपल्या देशात स्त्रियांना सुरक्षित वाटते का, स्वातंत्र्याचा आनंद खऱ्या अर्थाने त्यांना उपभोगायला मिळतो का, समाजात त्यांना समानतेची वागणूक मिळते का, कदाचित काही थोड्या स्त्रियांना मिळत असेल.

सर्वसाधारणपणे स्त्रियांची ओळख कशी करुन देण्यात येते, कोणाची तरी मुलगी, पत्नी, माता म्हणून. बरेचदा भारतीय स्त्रियांना वैयक्तिक बाबतीतसुध्दा मत देण्याचा अधिकार नसतो. त्यांनी केलेल्या कामाचं त्यांना मोल मिळत नाही. त्यांनी केलेल्या कामाचं कोणालाही कौतुक वाटत नाही. पुरुषप्रधान समाजात त्यांना राहावं लागतं. अनेकदा स्त्रियाच स्त्रियांच्या शत्रू बनतात. पण या अशा वातावरणातसुध्दा स्त्रिया राहतात आणि आपापल्या क्षेत्रात यश मिळवतात ही खरोखर लक्षणीय गोष्ट आहे व त्याही सुखासमाधानाने.

## पन्नासपैकी शून्य मार्क - शांता शेळके

त्यावेळी मी इंग्रजी पहिलीत होते. मी एका मुलांच्या शाळेत होते आणि माझ्या वर्गात मी एकटीच मुलगी होते. अर्थात बहुतेक शिक्षक माझे कौतुक करीत आणि मुलांना नेहमी मिळणारा छडीचा प्रसाद मला सहसा कधीही मिळत नसे. यामुळेच की काय, मी थोडीशी लाडावून गेले होते आणि आपण इतरांपेक्षा विशेष कुणीतरी आहोत असा किंचित सूक्ष्म अहंकार माझ्या मनात निर्माण झाला होता. पण एके दिवशी मला एक असा अनुभव आला होता की, त्या योगाने माझा तो अहंकार खाड्कन मावळून गेला. त्या दिवशी शाळेची इन्स्पेक्शन होती. आमच्या वर्गावर इन्स्पेक्टर आले त्यावेळी मराठीचा तास चालू होता आणि आमचे शिक्षक आम्हाला दारिद्र्य मरण यांतुनि मरण बरे बा दरिद्रता खोटी ही सुप्रसिध्द कविता शिकवीत होते. माझा मराठी विषय लहानपणापासून अतिशय चांगला होता. त्यामुळे शिक्षकांनी बरेचसे प्रश्न मलाही विचारले आणि मी ही त्यांची बरोबर उत्तरे दिली. इन्स्पेक्टरसाहेब खूष होवून गेलेले दिसले. ते वर्गाबाहेर गेल्यावर आमच्या शिक्षकांनी मला मन:पूर्वक शाबासकी दिली. या एवढ्या मोठ्या कौतुकाने मला त्या दिवशी स्वर्ग ठेंगणा झाला. आपण या इतर मुलांपेक्षा कुणीतरी फारच मोठ्या आहोत असे मला खरोखरच वाटू लागले आणि मी इतकी चढून गेले की, त्या दिवशी वर्गात कुणाशी बोलायलाही मी तयार होईना. मधली सुट्टी झाली. नंतरचा तास गणिताचा होता. मराठीला आम्हाला जे शिक्षक होते तेच गणितही शिकवीत असत. आज वर्गात येताना त्यांनी गेल्या आठवड्याच्या परीक्षेचे आमचे गणिताचे पेपर तपासून आणले होते. मास्तरांच्या हातातला तो पेपरचा गठ्ठा होता. त्यामुळे पेपर पाहून मला भिती वाटली. तरी पण मराठीच्या तासाला झालेल्या माझ्या कौतुकाची धुंदी अजून माझ्या मनावर रेंगाळत होती. वाटले, गणित, गणित ते काय आपल्याला पासापुरसते मार्क खचित मिळाले असतील.

मास्तरांची विद्यार्थ्यांचे नाव व मार्कांचा आकडा वाचीत एकेक पेपर द्यावयास सुरुवात केली. टेबलावरचा गठ्ठा जसजसा कमी होवू लागला तसतशी माझी छाती धडधडू लागली. माझ्या ओठांना कोरड पडली आणि डोळ्यांपुढे काजवे चमकू लागले. अखेर शेवटी टेबलावर एकच पेपर उरला. तो हाती घेवून मास्तर रुक्ष स्वरात म्हणाले, शांता शेळके, मार्क शून्य. त्या गणिताच्या पेपरामध्ये खरोखरच पन्नासपैकी शून्य गुण मिळवून मी दणदणीत नापास झाले होते. पायात कोणीतरी मणामणाच्या बेड्या घातल्या आहेत अशा थाटात टेबलाजवळ जावून मी पेपर घेवून आले. त्या दिवशी नापास झालेल्या इतर मुलांप्रमाणे माझ्याही हातावर सणसणून दोन छड्या बसल्या आणि दुपारपासून जी ऐट चढली होती ती तात्काळ नष्ट झाली. अजूनसुध्दा एखादे दिवशी माझे कशावरुन तरी कोणी विशेश कौतुक केले किंवा मला स्वत:लाच स्वत:विषयी फार कौतुक वाटू लागले तर लगेच त्या गणिताच्या पेपरची मला आठवणे होते व मी तात्काळ भानावर येते.

## ओळख गुणवंताची - श्रीमती प्रमिला दळवी

ओळख गुणवंताची या सदरात आपण श्रीमती प्रमिला आप्पाराव दळवी, बिगारी मोकादम, कोथरुड क्षेत्रीय कार्यालय यांची ओळख करुन घेणार आहोत.

श्रीमती प्रमिला दळवी यांचा जन्म माढा तालुका उपळाई खुर्द या गावी शेतमजुर व गढई काम करणाऱ्या गरीत कुटुंबात झाला. पोटापुरते अन्न मिळावे म्हणून त्यांच्या कुटुंबाला दुसऱ्याच्या शेतात शेतमजुरी करावी लागत असे. अशा परिस्थितीत श्रीमती दळवी यांनी कसेबसे दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

लग्नानंतर त्यांच्या पतीच्या घरची परिस्थितीही अतिशय हलाखीची होती. दोन वेळचे जेवण देखील व्यवस्थित मिळत नव्हते. त्यामुळे रोजगाराच्या शोधात श्रीमती दळवी आपल्या पतीसमवेत पुण्याला आल्या. झोपडपट्टीमध्ये एका लहानशा भाड्याच्या घरात राहून त्यांनी संसाराचा गाडा सुरु केला. त्यांना दोन मुले झाली. मुले लहान असतानाच त्यांच्या पतींना अर्धांगवायू झाला. त्यात ते अपंग झाले. त्यांना कामधंदा काही करता येत नव्हते. संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी, पतीच्या दवाखान्याचा खर्च व मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी श्रीमती दळवी यांचेवर आली.

दुसऱ्याच्या घरी धुणीभांडी, सोसायटीचे सफाईचे काम करता करता महापालिकेच्या आरोग्य खात्याकडे खाडे रोजंदारी झाडुवाली म्हणून १९९४ त्या कामास लागल्या.

श्रीमती दळवी यांनी आपल्या दोन्ही मुलांना रात्रंदिवस कष्ट करुन शिक्षण दिले. सन २००० साली त्या आरोग्य खात्यात झाडुवाली म्हणून कायम झाल्या. सकाळी ६ ते सायंकाळी ६ पर्यंत त्यांच्या कष्टाचे चक्र चालू होते. सकाळी महापालिकेचे काम करुन दुपारी त्या खाजगी सोसायटीमध्ये जावून कचरा गोळा करणे, झाडण काम करणे, फरशी पुसणे, इत्यादी कामे करत असत.

मोठा मुलगा युपीएससी स्पर्धा परीक्षेकरिता परगावी राहात असे. त्याच्या शिक्षणाचा खर्च खूप होता. सर्व पगार दोन्ही मुलांच्या शिक्षणासाठी खर्च होत असे. त्यामुळे काही वेळा घरात खायलादेखील काही नसायचे. तरीही त्यांनी खंबीरपणे मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहित केले.

श्रीमती दळवी यांची कामाची चिकाटी व युनियनच्या माध्यमातून कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न याची दखल घेवून त्यांना मोकादम म्हणून काम करण्याची संधी देण्यात आली. पुणे महापालिकेतील त्या सर्वात पहिल्या महिला मोकादम आहेत. आपल्या या यशामध्ये पुणे मनपा कामगार युनियनचा सिंहाचा वाटा असल्याचे त्या आवर्जून सांगतात.

आपल्यावर सोपविलेली जबाबदारी पाड पाडणे व नागरिकांच्या आरोग्याचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य असल्याचे त्या मानतात. त्यांचा मोठा



**श्रीमती प्रमिला दळवी**
**कोथरुड क्षेत्रीय कार्यालय**

मुलगा लंकेश युपीएससी ची परीक्षा देत असून, दुसरा मुलगा ज्ञानेश्वर हा सी.एस.च्या शेवटच्या वर्षामध्ये शिकत आहे. तसेच एलएलबीच्या देखील दोन परीक्षा तो उत्तीर्ण झालेला आहे. यापुढेही आपल्या दोन्ही मुलांना उच्चशिक्षित बनविण्याचे श्रीमती दळवी यांचे स्वप्न आहे.

कामगारांच्या प्रशासनाकडून खूप अपेक्षा असतात. त्यांना गणवेष, बुट, मास्क, रेनकोट वेळेत मिळाले पाहिजेत, बढती मिळाली पाहिजे, तसेच इतर अनेक सुविधा मिळाल्या पाहिजेत यासाठी युनियनच्या माध्यमातून प्रशासनापुढे मांडण्याचा प्रयत्न केला जातो. यामध्ये श्रीमती दळवी यादेखील युनियनच्या कार्यामध्ये सहभागी होतात. आपल्या हक्कांप्रमाणेच कर्तव्यांचीही जाणीव त्यांना आहे. दररोज वेळेवर कार्यालयात हजर राहणे, नेमून दिलेले काम चांगल्या दर्जाचे कसे करता येईल यासाठी प्रयत्न करणे, प्रशासकीय नियमाप्रमाणे कुटुंब नियोजन करणे, तसेच वरिष्ठांच्या नियमांचे पालन करणे, इत्यादी सर्व हक्क आणि कर्तव्यांची जाणीव प्रत्येक कर्मचाऱ्यास असावी असे त्यांना वाटते.

श्रीमती दळवी यांना कोणतेही व्यसन नाही. इतरांनाही व्यसनमुक्त करण्यासाठी त्या प्रयत्न करत असतात. चतुर्थश्रेणीतील कर्मचाऱ्यांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकास घडावा, नागरिकांना उत्तम दर्जाच्या नागरी सुविधा मिळाव्यात यासाठी प्रयत्नशील राहून, महापालिकेचा कारभार अधिक सक्षम कसा होईल यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्या सांगतात.

पारतंत्र्याच्या साखळदंडातूनी
मुक्त करण्याकरिता आपुली धरणी।।
बलिदान केले अनेक क्रांतीवीरांनी
चला घेवूया वसा आपण अंतरमणी।।
करु या स्वच्छ, सुंदर, हरित पुणे सर्वांनी
वरं जनहितं ध्येयम् साक्षात अवतरला पुण्यधरणी ।।

या विचाराप्रमाणे महापालिकेच्या प्रत्येक सेवकाने शहरामध्ये राहणाऱ्या नागरिकांना जास्तीत जास्त चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी प्रयत्नशील असायला हवे. प्रथम आपण महानगरपालिकेचे कर्मचारी आहोत, नागरिकांच्या कामास आपण प्रथम प्राधान्य द्यायला हवे. या जाणीवेतून त्या सतत कार्यरत असतात.

पुण्यामध्ये वाढत्या शहरीकरणामुळे दिवसेंदिवस कचऱ्याची समस्या मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागाचा एक भाग म्हणून कचरा निर्मूलनासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे त्या सांगतात. ओला कचरा आपल्या परिसरामध्येच जिरवून गांडुळ खत तयार करण्यासाठी नागरिकांना प्रशिक्षण देणे, त्यांना प्रोत्साहन करणे, यासारख्या योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करुन मनपा कर्मचाऱ्यांच्या समस्या थोड्याफार प्रमाणात का होईना कमी करण्याचा आपण प्रयत्न करणार असल्याचे त्या सांगतात.

श्रीमती दळवी यांना शिक्षणाचे महत्व पटले असून, तळागाळातील समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून देवून शिक्षितांचे प्रमाण वाढविले तरच देश प्रगतीशील होईल, असे त्यांचे मत आहे.

अशा या कर्तव्यनिष्ठ सेविकेच्या कामाची दखल घेवून सन २०१०-११ मध्ये त्यांना कामगार कल्याण निधीतर्फे गुणवंत कामगार पुरस्काराने गौरविण्यात आले.

श्रीमती दळवी यांच्या पुढील कारकिर्दीसाठी कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

## मनन आणि चिंतन

- नावे ठेवणे सोपे पण नाव कमविणे अवघड आहे.
- प्राप्तीच्या आनंदापेक्षा प्रयत्नांचा आनंद अधिक असतो.
- चित्र ही हाताची कृती आहे, पण चरित्र ही मनाची कृती आहे.
- जीवन हे सुखाने भरलेला पेला नसून, ते कर्तव्याने भरावयाचे माप आहे.
- चांगल्या गोष्टी प्रत्येक वेळी लगेचच घडतात असे नाही. अनेकदा त्यासाठी दीर्घकाळ प्रतिक्षा करावी लागते.

# कामगार दिंडी

पंढरपूर हे महाराष्ट्राचे उपास्य दैवत आहे. महाराष्ट्राच्या या अध्यात्मिक व सांस्कृतिक सहिष्णू परंपरेला अनेक शतकांची परंपरा आहे. वारीविषयीचे कमालीचे आकर्षण महाराष्ट्रीय मनाला आहे. वारी अध्यात्मिक उन्नतीचे, प्रगतीचे एक रम्य असे निधान महाराष्ट्रीय मनास वाटत आले आहे. वारी ही एक अध्यात्माबरोबरच खेळ, करमणुकीचा आनंद सोहळा आहे. जाता पंढरीची सुख वाटे जीवा या आत्मिक आनंद, सुखानुभीतीच्या सेवनासाठी वारकरी हा वारी करीत असतो. या ओढीतूनच अनेकविध जातीचे, सांप्रदायिक, धर्म, पंथाचे लोक या वारीत सहभागी होत असतात. शिवाय कलावंतांनाही या वारी सोहळ्यात प्रत्यक्ष सहभागी होण्याचा मोह आवरता आला नाही.

श्रध्दावंत वारकऱ्याइतकच तिनं मला हळवं करावं आणि आषाढीच्या ढगाळ आकाशानं, आषाढ सरीनं मी अस्वस्थ व्हावं, असे दि.बा.मोकाशी यांनी वारीविषयी म्हटले आहे.

विठोबा आणि आषाढीची वारी म्हणजे महाराष्ट्राचं सांस्कृतिक संचित. या संचिताचा मोह वारकऱ्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी त्यांच्या कुटुंबियांना पडला नाही तरच नवल. या मोहातूनच या अमृतमय आणि अध्यात्मिक आनंदाचा ब्रह्मरस सेवनासाठी ही कामगार दिंडी सन २००५ पासून दरवर्षी नियमाप्रमाणे पुणे मनपा कामगार दिंडी सोहळा चालत आहे. चित्त परमार्थाकडे वळविताना खूपच प्रयास पडतात. म्हणून तुकोबा माउली आपल्या अभंगात म्हणतात, रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग। अंतर्बाह्य जग आणि मन ।। त्यांनी आपल्या म नास परोपरीने आळविले आहे. मनाला कधी दैवत म्हटले आहे, कधी चंचल, कधी दुर्जन. पण प्रसंगी देवाला स्मरुन देवावर त्याला सांभाळण्याचा भार टाकावा. मनुष्य आपल्या बुध्दिला या चंचल मनाला किती आवरील. किती सावध राहिल. एका क्षणात पन्नास ठिकाणी भराऱ्या मारणारे हे मन देवाने कृपा केली तरच आवरणारे आहे.

आवरिता मन नावरे दुर्जन। घात करी मन माझे मज। अंतरी संसार भक्ति बाह्यात्कार। म्हणोनि अंतर तुझ्यापायी किंवा संत एकनाथांनी आपल्या भारुडातून म्हटले आहे,

अरेरे विंचू चावला, विंचू चावला
मनुष्य इंगळी अति दारुण
तिने नांगी मारियेला मज
त्या विंचवाला उतारा
तमोगुण मागे सारा.

म्हणून नोकरदार वर्ग संसार आणि नोकरी करताना या भवसागरातच अडकून पडलेला असतो. संसाराबरोबरच त्या जबाबदाऱ्या पूर्ततेसाठी धनसंचय, कर्तव्य, मोह माया यामध्येच त्याच्या आयुष्याची साठी गाठीत येते. परमार्थ हा फार यामधून साधता येत नाही किंवा वारकऱ्यासारखे १५-२० दिवस खास वारीसाठी इच्छा असून कर्तव्यापोटी जाता येत नाही. पण ही अतृप्त इच्छा या कामगार दिंडीच्या माध्यमातून पूर्ण होते. वारी कशी असते. पाय दुखत नाहीत का, उन वारा पाउस झेलत ही मंडळी कशी चालतात. तरीही आनंदी, थकतही नाहीत. या प्रश्नांची उत्तरे मिळतात. त्या आनंदाचा ठेवा लुटता येतो, भागवत धर्माच्या कुठलाही भेदभाव न ठेवता या आनंदपर्वणीचा अनुभव या कामगार दिंडीतून घेता येतो. आम्हा सर्वांसाठी हे ही नसे थोडके.

खरे पाहता, आपण सर्व संसारी, नोकरदार वर्ग असल्यामुळे आपली गती ही तुकाराम महाराजांच्या खालील अभंगाप्रमाणे असते

मी तव अनाथ अपराधी। कर्महीन
मतिमंद बुध्दि.
तुज म्या आठविले नाही कधी।
वाचे कृपानिधी मायबापा।।
नाही ऐकिले गाईले गीत। धरिली
लाज सांडिले हित।
नावडे पुराण बैसले संत।
केली बहु परनिंदा।।
नाही केला करविला परोपकार।
नाही दया आली पिडिता
पर करु नये केला व्यापार ।
वाहिला भार कुटुंबाचा ।।

म्हणूनी कर्म करता करता नामसंकीर्तण करा. परमेश्वराचे नाम घ्या. त्या एका मनोभावे केलेल्या नामस्मरणामुळे अनेक पापे जळतात. जिव्हे गोड तीन विठठल अक्षरांचा रस । अमृत जयास फिके पुढे । योग, याग, तप, दान वगैरे अवघड मार्गानी जावून देखील न मिळणारा परमात्मा आपल्याला केवळ नामस्मरणाने मिळाल्यामुळे अन्य लोकांनी देखील अन्य अवघड मार्गांऐवजी हेच सोपे साधन सर्वांनी स्विकारावे, हे तुकाराम महाराजांनी आवर्जून सांगितले आहे. ते म्हणतात,

नाम संकीर्तन साधन पै सोपे ।
जळतील पापे जन्मांतरीची।।
न लागती सायास जावे वनांतरा
सुखे येतो घरा नारायण ।।
ठायीच बैसोनी करा एकचित्त ।
आवडी अनंत आळवावा ।।
तुका म्हणे सोपे आहे सर्वांहुनी।
शहाणा तो धनी घेतो येथे ।।

म्हणुनी एक दिवस तरी सर्व अधिकारी, कर्मचारी या दिंडीमध्ये आपला हुद्दा, अधिकार विसरुन सर्वचजण एकत्र येतात. कारण आता सर्वत्र एकच प्रश्न उद्भवतो आहे. प्रत्येक जण म्हणतो आहे, विठ्ठला कोणता झेंडा घेवू हाती. पण वारकरी सांप्रदायात भागवत धर्माचा झेंडा हा अभिमानाने गर्वाने हाती घेतात. कारण

विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म,
नाही भेदाभेद भ्रम अमंगळ
अवघी एकाचीच वीण।
तेथे कैचे भिन्नभिन्न
कोणाही जिवाचा न घडो मत्सर।
वर्ग सर्वेश्वर पूजनाचे ।

हेच चित्र आमच्या या कामगार दिंडीमध्ये पहावयास मिळत होते. कारण इथे नसतो नोहे एकल्याचा खेळ अवघा मेळविला मेळ. कारण ही वारी म्हणजे विश्वाला कवेत घेणाऱ्या विठुरायाच्या डिंगरांचा एक अनुपम्य सोहळा. या सोहळ्यात सर्वांच्याच अंतरंगातील पांडुरंग जेंव्हा खेळिया होवून नाचू लागतो तेंव्हा आत हरी, बाहेर हरी अशी उन्मत्त, उदात्त भावना सर्वांची होते. याचीच प्रचीती या कामगार दिंडीत येत होती. वारकरी संप्रदायाचं भक्तिचं कृतिरुप म्हणजेच वारीतील खेळ आणि भारुडं. यांचं भक्तिनाट्य या वारीत तुम्ही आम्ही एकमेळी गदारोळी आनंद. लावोनि मृदुंग श्रुती टाळ घोष, सेवू ब्रम्हरस आवडीने आणि टाळाटाळी लोपला नाद, अंगोअंगी मुरला छंद अशी अवस्था दिंडीतील सर्वांचीच झाली होती.

या दिंडीमध्ये सर्व अधिकारी आणि कर्मचारी नर नारी हा भेद न बाळगता सर्वांनी फुगडी खेळही खेळला. तुजमज नाही भेद, केला सहज विनोद, जेथे वैष्णव नामघोष करतात अशा विठ्ठलाच्या पथमार्गात अखंड व अविरत नामसंकीर्तणाची फुगडी घातली जाते. फुगडी म्हणजे भाव आणि भक्तीचं एकात्मरुप. देहभान विसरुन देवभान आणणारी ही फुगडी जीव आणि शिवाच्या ऐक्याचेही प्रतीक आहे. संत एकनाथांनी या फुगडीचं वर्णन केलेलं आहे, ते असं -

फु फु फ फु फुगडी गे ।
दोघी घालू झगडीगे ।
जावूनी महाद्वारी गे ।
तेथे घालीन फुगडी गे ।।१।।
दोन्ही हस्तक धरुन गे ।
तेथे घालीन फुगडी गे ।
विटेवरील पाउल येवू गे ।
राहो माझ्या हृदयी गे ।
जेथे वैष्णवांचा भार गे ।
तेथे घालीन फुगडी गे ।।२।।
जेथे नामघोष गे ।
तेथे करीन झगडी गे ।
एका जनार्दनी पाहुनी गे ।
मन माझे झाले गे ।।३।।

म्हणूनच या वारीत स्त्री पुरुष असा भेदभाव न ठेवता वारकरी फुगड्या घालतात. फुगड्याच्या प्रकारात चार जणांची फुगडी, दंडमोडणी फुगडी, दोन हातांची फुगडी, बस फुगडी असे वेगवेगळे प्रकार आढळतात. त्याशिवाय पिंगा, चेंडूफळी, हुतुतू, हमामा, हुंबरी असे प्रकारही दिंडीत पहावयास मिळाले. यामध्ये मा. शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार), मा. विलास कानडे, सह महापालिका आयुक्त, स्थानिक संस्था कर यांनीही फुगडी खेळली. शिवाय मा. महापौर श्रीमती चंचला कोद्रे यांनीही महिला कर्मचाऱ्यांबरोबर फुगडी खेळली. शिवाय कर्मचाऱ्यांनीही आपापसात खूप फुगड्या खेळून या खेळाचा आनंद लुटला.

दिंडीमध्ये भजनाच्या कार्यक्रमानेही अतिशय रंगत आणली होती. दौंडकर आणि मा. कानडे साहेबांनीही भनामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेवुन कार्यक्रमाची रंगत वाढवली होती. शिवाय कामगार कल्याण अधिकारी नितीन केंजळे हे ही भजनात सहभागी झाले होते. तसेच, इतर भजनीमंडळातील कर्मचारीही अतिशय उत्स्फूर्तपणे ताल, लय, ठेका, टाळ मृदुंगाच्या तालात तल्लीन होवून भजनात दंग झाले होते. तसेच, प्रबोधनपर घोषवाक्याचे फलकानेही दिंडीस शोभा आली होती.

या कामगार दिंडीचे म्हस्के वस्ती येथे मा.चंचला कोद्रे, महापौर, मा. विकास देशमुख, महापालिका आयुक्त, मा. सतीश म्हस्के, सभासद, मा. सुमन पठारे, सभासद, मा. संजिला पठारे, सभासद, यांनी दिंडीप्रमुखांचे मानाचा नारळ देवून मन:पूर्वक स्वागत केले. शिवाजीनगर येथेही मा. आयुक्त आणि मा.खासदार श्री. अनिल शिरोळे यांनी कामगार दिंडीचे स्वागत केले.

तदनंतर कामगार दिंडी मनपा भवन येथे येवून वारकरी संप्रदायाप्रमाणे भजन करुन प्रार्थना, पसायदानाने समारोप केला. या कामगार दिंडीला दिघी मैगझीन येथे नाष्ट्याची सोय उत्तम प्रकारे श्री. मधुकर नरसिंगे आणि श्री. रोहिदास पठारे यांनी केली होती. तसेच, त्यांचे चिरंजीवही या दिंडीत सहभागी झाले होते. तसेच, कळस येथेही श्रीमती भारती मॅडम यांनीही चहा नाष्ट्याची सोय केली होती. राम सोसायटीतील मनपातील आजी-माजी सेवकांनी जेवणाची उत्कृष्ट सोय केली होती.

अशा रितीने कामगार दिंडी भक्तिमय व भावपूर्ण वातावरणात संपन्न झाली. गेल्यावर्षीच्या मानाने या वर्षी कामगार दिंडीत कर्मचारी वारकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. खरे पाहता असे म्हणतात की, एक तरी ओवी अनुभवावी. तसेच, पंढरीची वारी ज्यांना कर्मधर्मसंयोगाने जमत नाही त्यांनी या आळंदी ते कर्मपंढरी पर्यंतची एक तरी वारी अनुभवावी, असे वाटते. म्हणून सर्वांनी या कामगार दिंडीत जास्तीत जास्त संख्येने सहभागी होवून या अध्यात्मिक दिंडीची शोभा वाढवावी ही नम्र विनंती.

# रश्मी एकबोटे यांना बालगंधर्व पुरस्कार प्रदान



पुणे महानगरपालिका झोनिपु कार्यालयाकडील सिनिअर ग्रेड लेखनिक सौ. रश्मी एकबोटे यांना ऑर्केस्ट्रामधील गायनाच्या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल बालगंधर्व पुरस्काराने गौरविण्यात आले.

दिनांक २५/६/२०१४ रोजी बालगंधर्व रंगमंदीर येथे सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून सौ. शर्मिला पवार (मा. शरद पवार यांच्या स्नुषा) या उपस्थित होत्या. तसेच, प्रसिध्द व्यंगचित्रकार मा. मंगेश तेंडुलकर यांचीही कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती. स्मृतीचिन्ह, शॉल, नारळ व पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरुप होते.

सौ. एकबोटे यांनी सन १९७५ पासून ऑर्केस्ट्रामध्ये गाण्यास सुरुवात केली. तेंव्हापासून आजतागायत त्यांनी आपली कला जोपासली आहे. गेली ३९ वर्षे त्यांनी या क्षेत्रामध्ये केलेल्या उल्लेखनीय कामगिरीप्रित्यर्थ बालगंधर्व परिवारातर्फे त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. सन १९९७ पासून पुणे महानगरपालिकेतील सेवकांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी पुणे महानगरपालिका सांस्कृतिक कलामंचाची स्थापना करण्यात आली. सदर सांस्कृतिक कलामंचाच्या कार्यक्रमामध्ये त्यांचा सतत पुढाकार असतो.

म्युझिक असोसिएशन, पुणे यांच्यातर्फे सन २०१२ चा जीवन गौरव पुरस्कार त्यांना प्राप्त झाला आहे.

# वेळेचे नियोजन

वेळ ही कोणासाठी, थांबत नाही. वेळ येते व निघून जाते. वेळेचा उपयोग आपण कसा करायचा तो ज्याचा त्याचा भाग आहे. वेळेचा सदुपयोग सर्वच जण करुन घेतात असे नाही. वेळेचा नाश करणारी माणसेसुध्दा भरपूर प्रमाणात पहावयास मिळतात. काही जणांना वेळेचे महत्व इते असते की, ते एक एक क्षणाचा वापर स्वत:साठी करुन घेतात. थोडाही वेळ वाया घालवत नाहीत. प्रत्येक गोष्टीसाठी किती वेळ द्यायचा याचे नियोजन करतात व त्याप्रमाणे कामाचे तास ठरवितात. ज्यांना वेळेचे नियोजन करता येते तीच माणसे आयुष्यात फार उंच शिखरावर जावू शकतात. आज काय करायचे, उद्या काय करायचे हे यशस्वी झालेल्या उद्योगपतींना किंवा खेळाडूंना विचारले तर ते हेच सांगतील, आम्ही एक-एक क्षणाला महत्वाचे समजले म्हणून आम्हाला यश मिळाले. उदा. सचिन तेंडुलकर, मुकेश अंबानी, अनिल अंबानी, सायना नेहवाल, इत्यादी.

**वेळेचे महत्व कोणाला विचारावे ?**

एक वर्ष : नापास झालेल्या विद्यार्थ्यांना, वेळेवर परीक्षा फी न भरलेल्या विद्यार्थ्याला, फटाके विकणाऱ्या व्यापाऱ्याला, शाळेतील दाखल्यावर वय जास्त लावलेल्या व्यक्तीला.

**एक महिना :** एक महिना आधी जन्म देणाऱ्या आईला, भाडे न मिळणाऱ्या घरमालकाला, पगार न मिळालेल्या कर्मचाऱ्याला.

**एक दिवस :** दैनिकाच्या संपादकाला, एक दिवस परीक्षा फी भरण्यास उशीर झालेल्या विद्यार्थ्याला.

**एक तास :** भेटीसाठी प्रतिक्षा करणाऱ्या प्रेमी युगुलांना.

**एक मिनिट :** गाडी चुकलेल्या व्यक्तींना

**एक सेकंद :** अपघातातून वाचलेल्या व्यक्तींना, बाळाला जन्म देणाऱ्या आईला, खेळामध्ये द्वितीय आलेल्या खेळाडूला, सिग्नल तोडलेल्या व्यक्तीला.

# माहे जून, २०१४ सेवापूर्ती समारंभ संपन्न

दि.३०/६/१४ रोजी कॅ. वडके हॉल येथे जून,१४ मधील सेवानिवृत्त ५० अधिकारी/सेवकांसाठी



सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये ४७ वयपरत्वे व ३ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा.प्राचार्य शाम भुर्के, सदस्य, मराठी भाषा संवर्धन समिती उपस्थित होते. तसेच, मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी, सेवानिवृत्त सेवक संघाचे सचिव श्री. बाबा शेख उपस्थित होते. सेवानिवृत्तांमध्ये मा. लक्ष्मण डामसे, उप आयुक्त यांचाही समावेश होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. नितीन केंजळे यांनी केले. प्रास्ताविकामध्ये सेवापूर्ती समारंभ आयोजनाचे महत्व विषद करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच, सेवानिवृत्तीनंतर सेवकांना कोणकोणत्या बाबी करता येतील याबाबत मार्गदर्शन केले. सेवानिवृत्तीनंतर प्रशासकीय कामकाजाबाबत काही मदत लागल्यास सल्लागार (कामगार) कार्यालय कायम सेवकांच्या पाठीशी उभे राहील. आपणा सर्वांच्या सेवेचे महत्व खूप मोठे असून त्याची पोकळी भरुन काढणे शक्य होणार नाही, असे नमूद केले.

प्रमुख पाहुणे यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये जीवनामध्ये महत्वपूर्ण अशा काही गोष्टी सांगितल्या की जेणेकरुन जीवन सुंदर, सुकर व सुसह्य होईल. सर्वप्रथम नकारात्मक विचारांना सो व्हाट, मग काय झालं असे म्हणून स्विकारण्याचा मनोदय ठेवला पाहिजे. एखाद्याला निरोप देताना पुन्हा भेटू या, असे म्हणत जा. दुसऱ्यांच्या कामाचे कौतुक करा. झालेल्या चुकीबद्दल पश्चात्ताप करण्याचा किंवा चुका स्विकारण्याचा मानस राहू द्या. कोणाकडूनही अगदी कुटुंबातील लहान लहान व्यक्तींच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करा. त्यामुळे जनमानसांत एक अनोखे आत्मियतेचे ऋणानुबंध तयार होतात. अशा प्रकारच्या पंचसूत्रीचा वापर जीवनात केल्याने नाती अधिक दृढ होण्यास मदत होते. जीवनात नेहमी सकारात्मक दृष्टीकोन ठेवा. इतरांना प्रोत्साहन देवून त्यांची साध्या साध्या गोष्टींची चौकशी केल्याने आपुलकी वाढते. यामुळे जीवनात आनंद घेवून दुसऱ्यांनाही आनंदी ठेवता येते. अशा प्रकारे वागल्याने मनुष्य आपोआप सर्वांना प्रिय होतो. सर्वात महत्वाचे म्हणजे व्यसनांपासून दूर रहा. अशा प्रकारे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन प्रमुख पाहुण्यांनी केले.

त्यानंतर सेवानिवृत्तांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ.अलका जोशी यांनी केले. कार्यक्रम आयोजनात श्री.घोलप, श्री.राजपुरे, श्री.गेजगे, श्री.मरकड यांनी विशेष परिश्रम घेतले

## वाचकांसाठी...

- खातेप्रमुखांच्या कार्यालयाकडून दरमहा अंक उपलब्ध करुन कार्यालयाच्या दर्शनी भागावर/सूचना फलकावर लावा.
- आपला अंक वाचून झाल्यावर दुसऱ्याला वाचण्यास द्या.
- अभिप्राय व सूचना द्या.
- नवीन स्तुत्य उपक्रम/योजना/कार्यक्रम यांचे फोटोसहित संक्षिप्त वृत्त पाठवा.
- मनपा वेबसाईटवर प्रसिध्द केलेला अंक पहा.
- अंकाबाबत अभिप्राय पाठवा.

## आठवणीतील कविता

अडगळीच्या खोलीमधलं
दप्तर आजही जेंव्हा दिसतं।
मन पुन्हा तरुण होवून
बाकांवरती जावून बसतं।।
प्रार्थनेचा शब्द अन शब्द
माझ्या कानामध्ये घुमतो ।
गोल करुन डबा खायला
मग आठवणींचा मेळा जमतो ।।
या सगळ्यात लाल खुणांनी
गच्च भरलेली माझी वही
अपूर्णचा शेरा आणि
बाई तुमची शिल्लक सही ।।
रोजच्या अगदी त्याच चुका
आणि हातांवरले व्रण।
वहीत घट्ट मिटून घेतलेत
आयुष्यातले कोवळे क्षण ।।
पण या सगळ्या शिदोरीवरंच
बाई आता रोज जगतो ।
चुकलोच कधी तर तुमच्यासारखं
स्वत:लाच रागवून बघतो ।।
इवल्याश्या या रोपट्याची
तुम्ही इतकी वाढ केली आहे ।
हमखास हातचा चुकण्याची सुध्दा
सवय आता गेली आहे ।।
चांगलं अक्षर आल्याशिवाय
माझा हात लिहू देत नाही ।
एका ओळीत सातवा शब्द
आता ठरवून सुध्दा येत नाही ।।
दोन बोटं संस्कारांचा
समास तेवढा सोडतो आहे ।
फळ्यावरच्या सुविचारासारखी
रोज माणसं जोडतो आहे ।।
योग्य तिथे रेघ मारुन
प्रत्येक मर्यादा ठरवलेली ।
हळव्या क्षणांची काही पानं
ठळक अक्षरात गिरवलेली ।।
तारखेसह पूर्ण आहे वही ।
फक्त एकदा पाहून जा।
दहा पैकी दहा मार्क
आणि सही तेवढी देवून जा ।।

# या वसुंधरेला वाचवा

मागील वर्षी उत्तराखंड राज्यात ढगफुटीमुळे केदारनाथला महापुराचा तडाखा बसला. या पुरात अनेकजण मृत्यूमुखी पडले. अनेक लोक बेपत्ता झाले. अनेक बालके अनाथ झाली. हजारो माणसे बेघर झाली. काही गावे उध्वस्त झाली. यासारख्या घटनांचा जेंव्हा आपण गांभीर्याने विचार करतो, तेंव्हा लक्षात येते की, आपण पर्यावरणाची अपरिमित हानी केली आहे. त्याचाच परिणाम म्हणून निसर्ग आपल्यावर कोपला आहे. आमच्या देशातच नव्हे तर संपूर्ण जगात अशा अनैसर्गिक घटनांची जणू मालिकाच सुरु आहे.

या साऱ्या घटनांचा आपण जेंव्हा गांभीर्याने विचार करतो, संशोधन करतो, बारकाईने अभ्यास करतो, तेंव्हा शास्त्रज्ञांनी दिलेला इशारा पुन्हा पुन्हा विचार करायला लावतो. केदारनाथ येथील जलप्रलयाअगोदर काही दिवस अगोदरच पर्यावरण तज्ञांनी केंद्र सरकारला धोक्याचा इशारा देणारा अहवाल दिला होता. केदारनाथ येथे होत असलेला पर्यावरणाचा ऱ्हास, मानवी हस्तक्षेपामुळे कमकुवत होणारे डोंगर याकडे दुर्लक्ष केल्यामुळेच केवढी मोठी किंमत आपल्याला चुकवावी लागली. जगात घडणाऱ्या अशा अनैसर्गिक घटना भविष्यात येणाऱ्या मोठ्या प्रलयाची चाहुल मानवाला सावधानतेची जाणीव करुन देत आहेत. सतर्क राहण्याची जाणीव करुन देत आहे. आता तरी स्वत:ला जपण्यासाठी वृक्षारोपण कर असे तर नाही ना सांगत।

मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी पर्यावरणाचा ऱ्हास केला आहे. याचे गंभीर परिणाम आपल्याला भोगावे लागत आहेत. अरुणाचल प्रदेशाच्या वनसंपत्तीला ग्रहण लागलय. हिमालय जणू एक उघडी टेकडी होत चालला आहे. काश्मिरचं सौंदर्य कमी होत आहे. महाबळेश्वरचे नैसर्गिक वैभव नाहिसं झालय. मुंबईजवळचे माथेरान भकास होत चाललय. ग्लोबल वॉर्मिंगमुळे तापमानात होणारी वाढ ही धोक्याची घंटा म्हणावी लागेल. वन संपत्तीने नटलेल्या कोकणात कोकण रेल्वेच्याच साह्याने लाकडी मोळ्या इतरत्र पाठविल्या जातात. हीच परिस्थिती जर कायम राहिली तर असे वाटते. मानवाचा अंत जवळ आला आहे.

परिस्थिती निराशाजनक असली, खेदजनक असली तरी अजून वेळ गेलेली नाही. अजूनही परिस्थिती सुधारु शकते. फक्त गरज आहे वनीकरणाचे महत्व लक्षात घेण्याची. वृक्ष लागवड करण्याची, वृक्ष संवर्धन करण्याची, चराईबंदी, कुऱ्हाडबंदी करण्याची, प्रत्येकाने वनीकरणाचं महत्व लक्षात घेण्याची, नदीकाठी पडीक जमिनीवर वृक्षारोपन करण्याची, ओसाड जमिनीवर नंदनवन फुलविण्याची, गावात, शहरात औद्योगिक परिसरात वृक्ष लागवड करण्याची, वृक्षाला संरक्षण देण्याची, धार्मिक माध्यमातून वृक्ष लावण्याची, पूजा, अर्चा, सण यांसारखे संदर्भ देवून वृक्ष वाचविण्याची, पतिव्रता सावित्रीचा वड सांभाळण्याची, सीतेच्या अशोक वृक्षाला संरक्षण देण्याची, दत्तात्रय प्रभुंचा औदुंबर वृक्ष लावण्याचीश गोपाळ कृष्णाच्या तालवन मधुवन, वृंदावन यांसारख्या वनांना संरक्षण देण्याची. या वृक्षाची जोपासना करुन वने टिकविण्याची गरज आहे. महादेवाला बेल, गणपतीला जास्वंद, रुक्मिणीचा पारिजात, शबरीची बोरं, संत ज्ञानेश्वरांचा अजानवृक्ष सांभाळण्याची, हे वृक्ष आपल्या परिसरात लावण्याची. या माध्यमातून पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्याची गरज आहे.

या वृक्ष संवर्धनासाठी आदिवासींचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. त्याशिवाय वनशेतीतून ग्रामविकास साधण्याची फलोत्पन्न करुन विकास साधण्याची, युवकांना वनशेतीतून रोजगार उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. प्रत्येक राष्ट्रांनी जपानसारखी वनसंपत्ती टिकवून राष्ट्रविकास साधण्याची आवश्यकता आहे. पर्यावरण संरक्षणासाठी जे उपाय राष्ट्रीय पातळीवर चालू आहेत ते तळागाळापर्यंत पोहचले पाहिजेत. पडीक जमिनीवर फुलबाग फुलविण्याचा सानेगुरुजींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून कृती करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आवश्यकता आहे चिपको आंदोलन रुजविण्याची. आपल्या मुलांप्रमाणे वृक्षाचे संगोपन करणाऱ्या बिष्णोई महिलांचा आदर्श घेण्याची, प्रत्येकात सुंदरलाल बहुगुणांचे वृक्षप्रेम निर्माण होण्याची.

मानवाला स्वत:चे अस्तित्व टिकवायचे असेल, वसुंधरेला वाचवायचे असेल तर गरज आहे प्रत्येकाने वृक्षारोपन, वृक्ष संवर्धन करण्याची, पर्यावरण वाचवण्याची.


**कल्याणवार्ता**
जून, २०१४
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या
मतांशी प्रकाशक, संपादक,
कार्यकारी संपादक व पुणे
महापालिका
सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/
१२५३/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org